स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 28–07–2016** रोजी **सकाळी 10–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| **2.** | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| **3.** | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| **4.** | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्या |
| **5.** | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| **6.** | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| **7.** | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्या |
| **8.** | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्य |
| **9.** | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्य |
| **10.** | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| **11.** | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| **12.** | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| **13.** | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्या |
| **2.** | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्या |
| **3.** | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 315:– स्थायी समिती ठराव क्र. 203 दि. 10.06.2016 अनुसार नागपूर शहर महानगरपालिका पाणीपट्टी दर मुल्यांकन आणि वसुली (दुरूस्ती) उपविधी 2010 मधील उपभोक्ता प्रकार R1 व स्लम अंतर्गत येणाऱ्या व रू. 2000/– पेक्षा जास्त बकाया असलेल्या सर्व उपभोक्त्यांकरीता (न्याय

प्रविष्ठ प्रकरणे वगळुन) सर्व उपभोक्त्यांकडील दि. 31.03.2016 पर्यंतची बकाया राशी पैकी D.P.C. (विलंब शुल्क) वगळुन निव्वळ पाणीपट्टीची अर्धी रक्कम व संपूर्ण थकबाकीवरील D.P.C. (विलंब शुल्क) निर्लेखित करण्यास्तव तसेच ही रक्कम भरण्यास्तव दि. 31 जुलै 2016 पर्यंत मुदत देणे, मात्र अशा उपभोक्त्यांनी दि. 30.06.2016 पर्यंत सवलत दिल्यानंतर अनुज्ञेय होणाऱ्या राशीपैकी किमान 50 टक्के राशीचा भरणा करणे आवश्यक राहील या अटीवर निर्लेखित करण्यास्तव मंजुरी प्राप्त आहे.

या संदर्भात ज्या उपभोक्त्यांना या योजनांचा लाभ घेता आला नाही अशा उपभोक्त्यांकरीता या योजनेचा कालावधी दि. 01.08.2016 पासून दि. 10.08.2016 पर्यंत वाढविण्याचा प्रश्न तसेच या योजनेचा लाभ घेणाऱ्या उपभोक्त्यांनी भरायची उर्वरित अनुज्ञेय (OTS ची रक्कम) दि. 10.08.2016 पर्यंत एकमुस्त भरणे अनिवार्य राहील, मात्र विहीत मुदतीत जे उपभोक्ते थकबाकी असलेल्या राशीपैकी D.P.C. (विलंब शुल्क) वगळून निव्वळ पाणीपट्टीची अर्धी रक्कम पूर्णपणे भरणार नाही, त्या उपभोक्त्यांना पाणीपट्टीची मुळ थकबाकी (विलंब शुल्कासह) भरणे बंधनकारक राहील, निर्धारीत केलेल्या मुदतीनंतर अशा उपभोक्त्यांची थकबाकी बाबत कोणताही उजर ग्राहय धरण्यात येणार नाही व ते पाणीपट्टीची उपविधीच्या तरतुदीनुसार दंडणीय कार्यवाहीस पात्र होतील, या अटीवर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 316</u>:– प्रभाग क्र. 4 (ब) महेन्द्रनगर येथील बॅक कॉलोनी, सन्याल नगर, नालंदा नगर, टेलीफोन एक्सेंज कॉलोनी, जय भिम चौक ते म.न.पा ग्रंथालय येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. 48,77,286/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 317</u>:– प्रकाश विभागाच्या भांडारात व झोन मधे असलेले निरुपयोगी साहित्य (विद्युत व लोखंडी) विक्री करीता ई–निविदा बोलविल्या असता मे. रजा इलेक्ट्रिकल्स यांच्या प्राप्त झालेल्या अधिकतम निविदा दराप्रमाणे रु. ४८,१३,८८५/– ची निविदा मंजूर करण्याचा व प्राकलनात समाविष्ट व प्राकलन तयार केल्यापासून पूर्ण साहित्य विल्हेवाट करे पर्यंत जे निरुपयोगी साहित्य जमा होणार आहे ते सर्व साहित्य अधिकतम प्राप्त निविदा दरानुसार में. रजा इलेक्ट्रिकल्स विक्री करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 318</u>:– राज्य शासन महाराष्ट्र राज्य यांचे दि. 18 मार्च 2016 चे निर्देशांचे अनुषंगाने, नागपूर महानगरपालिका क्षेत्रात महावितरणतर्फे भुमीगत वीजवाहीनी टाकण्याकरीता महावितरण सोबत करावयाच्या सामंजस्य कराराच्या शासनमान्य मसुद्यावर योग्य विचारकरून म.न.पा.च्या हितात आहे किंवा नाही तसेच यामुळे म.न.पा.च्या उत्पन्नात काय घट होते आहे ? याकरिता स्थायी समिती ठराव क्रं. 138 दि. 02/05/2016 अन्वये गठीत त्रिसदस्यीय उपसमितीने स्थायी समितीसमोर सादर केलेल्या अहवालास मान्यता देवून त्यातील शिफारशी नुसार सदर प्रस्तावातील शासन निर्णयाची नोंद घेण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली तसेच म.न.पा. सभागृहाच्या मंजुरीकरिता पाठविण्यास समितीने एकमताने शिफारस केली.

<u>ठराव क्रमांक 319</u>:— प्रभाग क्र. 51 अ + ब वसंत नगर व धंतोली येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 29,98,151/—रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करून निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 682(A22001330803) (Fix Priority) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 320</u>:— नागपूर महानगरपालिकेने कस्तुरचंद पार्क येथे उंच राष्ट्रीय ध्वज उभारण्याचे नियोजित केले आहे. दिनांक 20.04.2016 रोजी मा. पालकमंत्री, यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या प्रकल्प आढावा बैठकीत तांत्रिक कारणास्तव ध्वजस्तंभाची उंची 200 फुट करणे व महानगरपालिका व लोकमत समुह यांच्यात सामजंस्य करार करून प्रकल्प राबविण्याबाबत सर्व उपस्थितांनी मान्य केले. सदर प्रकल्पाचे नांव लोकमत समुह व नागपूर महानगरपालिका यांचे संयुक्त उपक्रम असे राहणार असुन प्रकल्पातील ध्वजस्तंभ व झेंडा (1+3) यांचा खर्च अंदाजे रूपये 1.00 कोटी लोकमत समुह वहन करणार आहे. महानगरपालिकेतर्फे सौदर्यीकरण व इतर स्थापत्यकामे निविदा काढुन करण्यात येईल. प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर प्रकल्पाच्या देखभाल दुरूस्ती करिता अंदाजे 50—75 लक्ष रूपयांची तरतुद महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात करावी लागेल. किंवा C.S.R. द्वारे एखाद्या संस्थेस देता येईल. प्रकल्प पूर्ण झाल्यावर ध्वजस्तंभ व झेंडयाची दैनंदिन देखभाल दुरूस्ती म.न.पा.च्या अग्निशमन विभागातर्फे करण्यात येईल. सदर प्रकल्प राबविण्यास वरील बाबींना मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 321</u>:— प्रभाग क्र. 38 ब जुना बगडगंज गरोबा मैदान येथे श्री. राना ते श्री कापसे यांचे घरापर्यंत सीमेंट कॉक्रीट रस्त्याचे काम करण्यास्तव 37,16,330/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरीता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A42001470511 मधून रू. 37,17,000/— तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे.

<u>ठराव क्रमांक 322</u>:— प्रभाग क्र. 32 अ सतरंजीपूरा स्लम येथील तेलंगीपूरा, मुसलमानपूरा व नवा बगडगंज बुध्दपूरा येथे विविध ठिकाणी भुमीगत पाईप लाईन आकण्याचे काम करण्यास्तव 44,66,904/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरीता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A43901371913 मधून रू. 44,70,000/— तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे.

<u>ठराव क्रमांक 323</u>:— प्रभाग क्र. 32 अ क्वेटा कॉलोनी येथील भुखंड क्र. 93 ते भुखंड क्र. 149 पर्यंत सीमेंट कॉक्रीट रस्त्याचे काम करण्यास्तव 41,25,182/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरीता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A22001330802 मधून रू. 41,30,000/— तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे.

<u>ठराव क्रमांक 324</u>:— प्रभाग क्र. 64 ब महालक्ष्मीनगर नं. 1, 2 व 3 लाडीकर ले आऊट येथे सी.सी. फ्लोरींग सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव रू. 49,98,755/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 325</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर